# विपश्यना

**साधकांचे मासिक प्रेरणा पत्र**

**बुद्धवर्ष २५५७, वैशाख पौर्णिमा, २५ मे २०१३ वर्ष २ अंक ३**

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहा: http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx


**धम्मवाणी**

**असेवना च बालानं, पण्डितानञ्च सेवना।**
**पूजा च पूजनेय्यानं, एतं मङ्गलमुत्तमं॥**

*मङ्गलसुत्त- १, खुद्दकपाठो*

दुर्जनांच्या संगतीपासून वाचणे, संताची संगत करणे आणि पूजनीय गुरुजनांचे पूजन-वंदन करणे, हे उत्तम मंगल आहे!

## कृतज्ञ आहे

परम आदरणीय गुरुदेव!

आपले मंगलमय सान्निध्य आजही जाणवते. धर्माचे सान्निध्य आहे तर आपले सान्निध्य आहेच. धर्माचे सान्निध्य राहो ज्यामुळे आपले मंगलमय सान्निध्य राहील. हाच उत्तम संकल्प आहे.

किती मंगलमय आहे आपले सान्निध्य! धर्माचे सान्निध्य! जेव्हा जेव्हा धर्म सान्निध्य होते तेव्हा तेव्हा आपल्या असीम करुणेचे स्मरण होते आणि मन कृतज्ञता व पुलक-रोमांचाने भरून जाते.

मन कृतज्ञतेने भरते – त्या भगवान **सम्यक संबुद्ध शाक्यमुनि गौतमच्या** प्रती, ज्यांनी असंख्य जन्मांपर्यंत साधनामय जीवन जगत दहा पुण्य-पारमितांना परिपूर्ण केले. ज्यामुळे न केवळ आपली स्वस्ति-मुक्ती साधता येईल, तर अनेकांच्या स्वस्ति-मुक्तीचे कारण बनेल. अशी कल्याणकारी विद्या शोधून काढली जिला जीवनभर करुणाचित्ताने मुक्तहस्त वाटत राहिले, ज्यामुळे अगणित लोकांचे मंगल साधले.

मन कृतज्ञतेने भरते– त्या **जीवनमुक्त अरहंतांच्या** प्रती ज्यांनी ही कल्याणकारी विद्या भगवानांपासून प्राप्त करून *"चरथ भिक्खवे चारिकं, बहुजनहिताय, बहुजन सुखाय, लोकानु-कम्पाय"* च्या मंगल आदेशाला शिरोधार्य करून गावा-गावात, नगर-नगरात, जनपद-जनपदात ह्या मुक्तिदायिनी विद्येला वाटण्यात आपले जीवन लावले.

मन कृतज्ञतेने भरते – त्या सर्व **सत्पुरुषांच्या** प्रती ज्यांनी ह्या पावन धर्म-गंगेला अनेक पिढ्यांपर्यंत प्रवाहित ठेवले.

मन कृतज्ञतेने भरते – त्या **अरहंत सोण** आणि **उत्तर** यांच्या प्रती जे विदेश-यात्रेच्या सर्व संकटांना झेलीत भागीरथा प्रमाणे ह्या धर्मगंगेला स्वर्णभूमिला घेऊन गेले आणि अगणित तहानलेल्यांची लहान भागविली.

मन कृतज्ञतेने भरते – त्या परंपरागत **धर्म-आचार्यांच्या** प्रती ज्यांनी ब्रम्हदेशात गुरू-शिष्य परंपरेद्वारे ह्या विद्येला पिढ्यान् पिढ्या आपल्या शुद्ध रूपात कायम ठेवले. ह्यात शब्दांचे, रंग-रूपाचे, आकृती, कल्पना इत्यादीचे संमिश्रण होऊ दिले नाही. जो मार्ग स्थूल भासमान सत्याचे भेदन करीत सूक्ष्मतम परम सत्याकडे नेणारा राजमार्ग आहे, त्याला एका स्थूल भासमान सत्याकडून दुसऱ्या स्थूल भासमान सत्याकडे घेऊन जाणारी आंधळी बोळ बनविले नाही. शुद्ध रूपात ठेवले तेव्हाच तर आम्हाला शुद्ध रूपात ही विद्या मिळाली.

मन कृतज्ञतेने भरते – ह्या पुनीत आचार्य-परंपरेच्या मागील शताब्दीचे जाज्वल्य नक्षत्र **लैडी सयाडो** ह्यांच्या प्रती आणि सद्गृहस्थ आचार्य **सयातैजींच्या** प्रती ज्यांनी ह्या उत्तरदायित्वाला किती आदर्शरूपाने निभविले.

मन कृतज्ञतेने भरते– **गुरुदेव!** आपल्या प्रती इतक्या करुणचित्ताने ह्या अनमोल धर्मरत्नाचे दान दिले. जर हे धर्मरत्न मिळाले नसते तर काय दशा झाली असती? धन दौलतीच्या संचय-संग्रहात आणि सामाजिक पद-प्रतिष्ठेच्या स्पर्धा धावाधावीतच जीवन हरविले असते. धर्माकडे झुकाव झाला असता तरी एखाद्या संप्रदायाच्या वेड्यांनाच आभूषण मानले असते. परक्या अनुभूतिंच्या गर्वातच जीवन गमविले असते. सत्य धर्माची प्रत्यक्षानुभूती असणारे हे सम्यक-दर्शन कसे उपलब्ध होते? कल्पनांनाच सम्यक-दर्शन मानून संतुष्ट झालो असतो. यथार्थ दर्शनद्वारे सम्यक-ज्ञान कोठे उपलब्ध होते? बौद्धिक चर्चेलाच सम्यक-ज्ञान मानून जीवन गमविले असते. कर्मकांड, पूजा-पाठ, भजन-कीर्तन अथवा स्वानुभूतीविहिन मत-मतांतरीय दार्शनिक मान्यतांच्या बंधनातच अनमोल मनुष्य जीवन गमविले असते. आपण हे अनुत्तर-अनुपम धर्मदान देऊन मानव-जीवन सफल केले गुरुदेव!

खरोखर, अनुत्तर अनुपमच आहे ही धर्म-साधना! किती ऋजू, किती स्पष्ट, किती वैज्ञानिक, किती मांगलिक! बंधनांपासून मुक्तीकडे नेणारी, माया-मृगजळाकडून निर्भ्रांतीकडे घेऊन जाणारी! भासमान प्रकट सत्याकडून परमसत्याकडे घेऊन जाणारी! अशा अनमोल निधीची निर्मळता आपल्या शुद्ध-रूपात कायम राहो, आजच्या पुण्य-दिवशी हाच उत्तम-संकल्प आहे. कधीही कोणत्याही प्रकारच्या संमिश्रणाच्या चुकीचा हिमालया ऐवढा मोठा अपराध होऊ नये! हा अनमोल निधी आपल्या शुद्ध रूपात कायम राहो आणि ह्याच्या अभ्यासाने जन जनांच्या मुक्तीसाठी अमृताची द्वारे उघडोत, ह्यातच आपले खरे पूजन-वंदन, आदर-सन्मान सामावला आहे.

विनीत धर्मपुत्र
सत्यनारायण गोयन्का

---

# एक जिज्ञासा

ही जिज्ञासा जवळपास सर्वांच्या मनात सामावली राहते की तो कोण आहे जो जन्मल्यावर आमचा मृत्यू निश्चित करतो आणि मरणानंतर पुनर्जन्म देतो? अधिकतर लोक त्याला ईश्वराच्या रूपात मानतात. तो ईश्वर आहे जो आम्हाला जन्म देतो आणि मृत्यूपर्यंत पोहोचवतो व पुन्हा जन्म देतो. बुद्धांच्या पूर्वीही असे प्रश्न निर्माण व्हायचे, बुद्धांच्या वेळीही आणि बुद्धांच्या नंतरही. बुद्धांच्या नंतरचा एक भारतीय संत म्हणतो – **'पुनरपि जननम्, पुनरपि मरणम्, पुनरपि जननी जठरे शयनम्** तो इतरांप्रमाणे आपल्या परमात्मा, मुरारीला प्रार्थना करतो– **'पाहि मुरारे.....'** मला ह्या भव-संसरणापासून बाहेर काढा.

बुद्धांनीही ह्या सत्याला जाणण्यासाठी, ह्या समस्येच्या समाधानासाठी अनेक जन्मात खूप वेळ घालविला की 'तो कोण आहे जो प्रत्येक मृत्यूनंतर नवा जन्म देतो.' शेवटी जेव्हा सम्यक संबोधी जागली तेव्हा तर सर्व स्पष्ट झाले की पुनर्जन्म कोणी देत नाही. आम्ही स्वतः आपल्यासाठी पुनर्जन्माची तयारी करत राहतो. आमच्या मनात जितकेही कर्म-संस्कारांचे बीज आहेत त्यापैकी प्रत्येक बीज आपले फळ घेऊन येते. मृत्यूच्या वेळी कोणते ना कोणते बीज प्रमुख होऊन आमच्यासाठी एक नवीन जन्म घडवते. संबोधीमुळे ही बाब स्पष्ट झाली की मी आपल्या पुनर्जन्माला समाप्त केले आहे. ज्या कर्म-बीजांमुळे हा पुनर्जन्म होतो त्यांना नष्ट केले आहे. नवीन घर बनविणाऱ्याला न जानो केव्हापासून शोधत होतो. आता स्पष्ट झाले की माझ्या आत एकही जुने कर्म-बीज राहिले नाही आणि नवीन कर्म-बीज बनविण्याची तृष्णा राहिली नाही. त्यामुळे स्पष्ट झाले की मीच आपले घर बनवीत होतो, इतर कोणी माझे नवीन घर बनविणारा नाही. जेव्हा पुनर्जन्माचे बीज समाप्त झाले तेव्हा म्हटले – **'नत्थिदानि पुनब्भवेति'** -आता नवा जन्म होणार नाही. **'अयं अन्तिमा जाति'**– हा अंतिम जन्म आहे.

शोध पूर्ण झाला. आतापर्यंत कोणत्या तरी अन्याला नवीन जन्म देणारा मानत होतो आणि मानत होतो की तोच माझ्यासाठी नवे-नवे घर बनवून तयार ठेवतो, तो ईश्वरच आहे. आता हा भ्रम दूर झाला. 'मीच माझा ईश्वर आहे, अन्य कोणी नाही.'

प्रकृतीच ईश्वर आहे अन्य कोणी नाही. प्रकृतीच्या नियमांनुसार **'जसे बीज तसे फळ'** सर्वांना मिळते. कोणाला वाटते की मी बीज तर कडुनिंबाचे टाकू, परंतु फळे त्यात गोड आंब्याची लागोत, तर हे असंभव आहे. जसे बीज आहे. तसेच फळ येईल. असेच जसे आमचे कर्म-बीज आहेत, तसेच कर्म-फळ येतील. मृत्यूच्या वेळी आमच्या संचित कर्म-बीजांपैकी कोणत्यातरी खालच्या वर्गाचे बीज प्रबळ होऊन समोर येते आणि आम्हाला अधोगतीचे फळ देते. अधोगतीचे फळ देणारे बीज समाप्त झाले तर एखाद्या ऊर्ध्वगतीच्या बीजामुळे आम्हाला ऊर्ध्वलोकाचे फळ मिळते. हा प्रकृतीचा निश्चित केलेला अतूट नियम आहे. ह्यात कोणा मुरारीची कृपा काम करीत नाही. बुद्ध झाल्यावर अधोगतीचेच नाही तर ऊर्ध्वगतीचेही सारे कर्म-बीज नष्ट झाले, कोणी फळ देणारा राहिला नाही. अशा अवस्थेत सारे रहस्य स्पष्ट झाले. हीच बुद्धांची संबोधी होती.

बुद्ध स्वतःही ह्या शोधात खूप भटकले. अनेक जन्मात ह्याचा शोध घेत राहिले की मरनानंतर माझ्यासाठी नवे-नवे घर बनविनारा तो कोण आहे? त्यांनी स्पष्ट शब्दात म्हटले– **'अनेक जातिसंसारं, खन्धाविस्सं अनिब्बिसं'**– अनेक जन्म न थांबता संधावन करीत राहिलो. **गहकारं गवेसन्तो, दुक्खा जाति पुनप्पुनं**'– घर बनविणाऱ्याच्या शोधात वारंवार दुःखमय जन्म घेत राहिलो. **'गहकारक दिट्ठोसि, पुनगेहं नकाहसि**'– हे गृहकारका! मी तुला पाहिले. आता तू माझ्यासाठी कोणतेही नवे घर बनवू शकत नाहीस!

**'सब्बा ते फासुका भग्गा, गहकूटं विसङ्खतं।**
**विसङ्खारगतं चित्तं, तण्हानं खयमज्झगा।'**

– घर बनविण्याच्या साऱ्या कड्या भग्न झाल्या, घराचे शिखर विशृंखलित झाले म्हणजे ह्या पुनर्जन्माचे रहस्य समजले. हे घर बनविणाऱ्या! आता तू माझ्यासाठी नवीन घर बनवू शकत नाहीस. कारण मी आपल्या आतील कर्म-संस्कारांचे सारे बीज विपश्यनेद्वारे समाप्त केले आहेत आणि आता तृष्णा राहिलीच नाही, ज्यामुळे नवीन संस्कार बनतील. ह्यानंतर न जुने राहिले आणि न नवीन बनू शकतील. कर्म बीजच राहिले नाही तर कर्म-फल कोठून येईल?

ह्या मुक्त अवस्थेत सारे रहस्य स्पष्ट झाले. आता कोण्याही मुरारीची प्रार्थना करण्याची गरजच राहिली नाही जो कोणाला भव संसारणापासून मुक्त करू शकेल. आता हे स्पष्ट झाले की –**'आपली मुक्ती आपल्या हाती'**. जेव्हा सारे जुने कर्म-संस्कार विपश्यनाद्वारे नष्ट झाले आणि नवीन संस्कार बनविणाऱ्या तृष्णेचे नावनिशान राहिले नाही, अशा अवस्थेत पुनर्जन्माला काही अर्थच उरला नाही. त्यामुळे ईश्वराच्या नावाची कल्पना आणि त्याला केलेली प्रार्थना दोन्हीही निरर्थक आहेत, अर्थहीन आहेत.

जेव्हा भगवान बुद्धांची ही वाणी प्रसिद्ध व्हायला लागली तेव्हा पुरोहितांच्या पायखालची जमीन हलू लागली. आतापर्यंत ते कोणत्यातरी परमात्म्याची प्रार्थना करणे शिकवीत होते, जो त्यांना भव-संसारणापासून मुक्त करू शकेल. परंतु बुद्धांच्या अनुसार असा न तर परमात्मा आहे, न अन्य कोणी त्यांना भव-संसरनापासून मुक्त करू शकतो. बुद्धांच्या ह्या घोषणेने पुरोहितांच्या पायाखालची जमीन हलू लागली. काय करणार? मोठे मोठे यज्ञ स्थापित करून आपल्यासाठी अपार धन प्राप्त करण्याच्या योजना समाप्त झाल्या. जेव्हा ईश्वरच नाही तेव्हा कोणी का त्यांच्याकडून यज्ञ करवेल आणि का मोठी दान-दक्षिणा देईल? तेव्हा त्यांनी एक चाल खेळली. बुद्धांनाच ईश्वर बनविले. म्हणजे बुद्धांनाच ईश्वराचा अवतार घोषित केले. ह्या साफ खोटेपणामुळे अनेक लोक सत्यापासून विचलित झाले. परंतु जे वाचले ते ह्या भ्रमात गुंतू शकले नाहीत.

बुद्ध-विरोधी लोकात ह्या बाबीचे दुःख राहिले की सम्यक संबुद्धांच्या एवढ्या स्पष्ट विवेचनाद्वारे हे सिद्ध झाले की पुनर्जन्म देणारा कोणी ईश्वर नाही. ही प्रकृतीच आहे जी आपल्या नियमांनुसार काम करते. त्यांना ह्या बाबीचे दुःख राहिले की बुद्धांना ईश्वराचा अवतार सांगून ईश्वरवादाला कायम ठेवण्याचा जो मिथ्या प्रयत्न केला जात होता, त्याचा त्यांना काहीही मनोवांछित परिणाम मिळाला नाही. जे लोक समजदार होते, त्यांनी आपली चूक स्विकारली.

कांची कामकोटी पीठाचे जगद्गुरु श्री जयेन्द सरस्वती यांच्याशी ह्यावर चर्चा झाली. ते उदार वृत्तीचे संत पुरुष आहेत. त्यांनी ही चूक ताबडतोब स्विकारली आणि माझ्या सोबत जो समझोता केला गेला त्यात प्रथम बाब हीच ठेवण्यात आली की बुद्ध कोण्याही ईश्वराचे अवतार नव्हते. त्यांची उदार दृष्टी आणि वास्तविकतेला समजून अन्य तिन्ही पीठासीन जगद्गुरु शंकराचार्य– श्री भारती तीर्थ महास्वामी, शृंगेरी पीठाधीश्वर श्री स्वरूपानंद सरस्वती महाराज द्वारका शारदा पीठाधीश्वर आणि श्री विद्यानंद गिरी महामंडलेश्वर कैलास आश्रम पीठाधीश्वरांनीही ह्या तथ्याला स्विकारले.

इतके झाल्यावरही कोणाच्या मनांत हा भ्रम असेल की बुद्ध ईश्वराचे अवतार होते, तर ही खोटी मान्यता कुठपर्यंत चालेल?

बुद्धांनी ईश्वराच्या अस्तित्वालाच नाकारले तर आता पूजा करणारे कोणाची पूजा करतील? बुद्धांनी स्वतः शिष्यांना वारंवार सांगितली की मी तुमच्यासाठी काहीही करू शकत नाही. तुम्हाला स्वतः आपले जीवन सुधारायचे आहे. मी मुक्तिदाता नाही, केवळ मार्गदाता आहे. मी मार्ग सांगितला. आता त्यावर चालणे तुमचे काम आहे. त्यानंतर भविष्यासाठी तुमच्याद्वारे केलेली चांगली कामेच चांगले फळ आणतील. काम तुम्हाला करावयाचे आहे. मी तर मार्ग आख्यात करणारा आहे–'**'तुम्हेहि किच्चमातप्पं, अक्खातारो तथागता'।** बुद्धांच्या ह्या घोषणेने बुद्ध-विरोधी सर्व पुरोहितांना हालवून टाकले.

जर ईश्वराची प्रार्थना करू नये तर अन्य छोट्या मोठ्या देवी-देवतांचीच प्रार्थना करून आपली इच्छा पूर्ती करावी. परंतु जेव्हा स्वतः काम करावयाचे आहे आणि जेव्हा आमच्या मनाप्रमाणे करून देणारा कोणी आहेच नाही, तेव्हा आम्ही कोणाची पूजा करावी, कोणाची प्रार्थना करावी? जेव्हा बुद्धांनी म्हटले की तुमच्या इच्छांची पूर्ती कोणी दूसरा करू शकत नाही. भवसंसरणापासून सुटण्यासाठी तुम्हाला स्वतः विपश्यनेद्वारे आपल्या अधोगती आणि उर्ध्वगतीच्या साऱ्या कर्म बीजांना समाप्त करावे लागेल. पुढे नवीन कर्म-बीज बनविणार नाही तर भव संसरणापासून स्वतः मुक्ती मिळेल. ह्या घोषणेने छोट्या-मोठ्या सर्व पुरोहितांची जमीन हालल्या गेली.

**'न कोणी ईश्वर आहे जो आम्हाला मुक्त करू शकेल आणि न छोट्या-मोठ्या देवी-देवता आहेत, ज्या आमच्या इच्छांची पूर्ती करतील.'** ह्या दोन वक्तव्यांमुळेच बुद्धांना घोर नास्तिक ठरविले गेले. तरीही त्यांची शिकवण पसरतच गेली, कारण ती सार्वजनिक शिकवण होती. तो काही संप्रदाय नव्हता, कारण बुद्धाने कोणताही संप्रदाय स्थापित केला नाही. बुद्धाने धर्म शिकविला आणि जे शिकविले, ते सार्वजनिक होते, सर्वांसाठी समान रूपाने उपकारी होते. सदाचाराचे जीवन जगणे आणि मनाला बाहेरी आलंबनाशिवाय एकाग्र करणे व आत जे काही जाणवत आहे, त्या सत्यालाच समतेने पाहाने– हा मार्ग सर्वांसाठी अनुकूल होता आणि पसरतच गेला. कारण सत्य तर सत्य आहे. बुद्धांना नास्तिक म्हटल्यामुळे सांसारिक सत्य खोटे होऊ शकत नाही.

आता ह्या जिज्ञासेची पूर्ती झाली की आपले घर बनविण्यासाठी आम्ही स्वतः जबाबदार आहो. कोणी दूसरा आमच्यासाठी नवीन घर बनवीत नाही. मिथ्यादृष्टी दूर झाली, सत्य ज्ञान जागले. बुद्धांच्या शिकवणुकीचा उद्देश पूर्ण झाला की प्रत्येक व्यक्ती आपल्या भविष्याला स्वतः जबाबदार आहे. जेव्हापर्यंत कर्म-बीज आहेत, तेव्हापर्यंत नवे-नवे घर बनत राहतील. विपश्यनाद्वारे सारे कर्म-बीज समाप्त केले तर नवे घर बनू शकनार नाही. ह्याच्यापूर्वी आपल्या ईष्टदेवाला प्रार्थना करीत होतो की माझे काम, क्रोध, लोभ, मोहयांना दूर कर, ह्यापासून सुटका कर. रोज-रोज अश्रुभरल्या डोळ्यांनी प्रार्थना करीत राहिलो, परंतु कोणी देवी-देवता माझ्यासाठी काहीही करू शकले नाही. आता विपश्यनेमुळे माझ्या मनाची इच्छा पूर्ण झाली. एक मोठी जिज्ञासा पूर्ण झाली. माझे कल्याण झाले. ह्यातच सर्वांचे कल्याण सामावले आहे.

कल्याणमित्र

सत्यनारायण गोयन्का

---

# मित्र उपक्रम धम्मसेवा

**मित्र उपक्रम धम्मसेवा**

पूज्य गुरुदेवांची दूरदृष्टी ह्या बाबीवर गेली की सर्व शाळेत आनापान लहाणपणापासूनच शिकविले जावे. ह्यासाठी आवश्यक होते की शाळेचे शिक्षकही विपश्यना करोत ज्यामुळे ते मुलांना नियमित अभ्यास करवू शकण्यात सहायक होऊ शकतील. त्यासाठी महाराष्ट्र सरकारने आपल्या सर्व शाळेत एक जी. आर. काढून शिक्षकांना विपश्यना शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले. विपश्यना विशोधन विन्यास आणि महाराष्ट्र सरकारच्या सहयोगाने 'मित्र उपक्रम' ची स्थापना केली गेली आणि ह्याच्या संचालनासाठी अनेक सहायक आचार्य, सरकारी अधिकारी व धर्मसेवकांनी मिळून कामाला वेग दिला. ह्या प्रकारे महाराष्ट्रात आता जवळपास अडीच कोटी विद्यार्थांना आनापान शिकविण्यात आले आहे.

मागील वर्षी जवळपास २,८०० शाळा शिक्षकांनी विपश्यनेच्या १० दिवसीय शिबिरात भाग घेतला आणि ह्या वर्षी जवळपास ५०,००० शिक्षक शिबिरात भाग घेणार आहेत. ही शिबिरे केंद्र नसलेल्या ठिकाणी लावली जातील, ज्यांच्या योग्य रीतीने संचालनासाठी खूप मोठ्या संख्येने धर्मसेवकांची आवश्यकता आहे. कृपया धर्मसेवेसाठी आपले नाव खालील फोन नंबरांवर अथवा ईमेलने लिहून पाठवावे.

**मुंबई क्षेत्रात–** सफाले, पनवेल व बिलोमोरासाठी - कु. दीना रवानी– ९८३३६९३३४३. **नाशिक–** श्री. साजिद वजीर शेख - ९८२३१५२२५४ अथवा ईमेल- sajid.shaikh@sarda.co.in; **कोल्हापूर –** श्री सुनील चौगुले – ९४२२८५५२५८; **अन्य स्थानांसाठी** – श्री रवीन्द्र खरात - ९९३०२६८८७५

**मुख्य ईमेल-** mitraupkrammumbai@gmail.com,

**online Regn.** http//www.globalpagoda.org/mitra-seva

आवेदन पत्र मिळाल्यावर धर्मसेवकांना त्यांच्यासाठी विशेष कार्यसूची व अन्य विवरण समजविले जातील ज्यामुळे त्यांच्या सेवेचा जास्तीत-जास्त लाभ लोकांना प्राप्त होऊ शकेल आणि खऱ्या अर्थाने **बहुजनहिताय बहुजनसुखाय लोकानुकम्पाय** सेवा होईल. जे आचार्य ह्या शिबिरात सेवा देऊ इच्छित असतील त्यांनी कृपया श्री ऋषिकांत मेहतांशी ०९४०८२८३०१८ वर संपर्क साधावा. धन्यवाद!

---

**बुद्धशिकवण आणि विपश्यनावर एक वर्षीय पाली डिप्लोमा कोर्स**

वी आर आय व मुंबई विश्वविद्यालयाच्या दर्शन-विभागाच्या संयुक्त उपक्रमाअंतर्गत वर्ष १३-१४ मध्ये इंग्रजी माध्यमातून पाली डिप्लोमा कोर्स आयोजित केला गेला आहे, ज्यात भगवान बुद्धांच्या शिकवणुकीतील सिद्धांतीक व व्यावहारिक पक्षांचे निरूपण केले जाईल. स्थळ– ज्ञानेश्वर भवन, दर्शन विभाग, मुंबई विश्वविद्यालय विद्यानगरी परिसर, कालीना, सांताक्रुज (पूर्व) मुंबई -४०००९८. आवेदन पत्र – वरील ठिकाणी उबलब्ध – १ ते १५ जुलै सोमवार ते शुक्रवार, ११. ३० ते २. ३० वाजेपर्यंत. कोर्स कालावधी – २०/७/१३ ते ३१/३/१४ वेळ– दुपारी २. ३० ते संध्या ६. ३० वाजेपर्यंत, योग्यता– कमीतकमी १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक. तसेच दिवाळीच्या सुट्टीमध्ये विपश्यना शिबिरात भाग घेणे आवश्यक असेल. अधिक माहितीसाठी संपर्क करा– डॉ शारदा संघवी– फोनः ०२२- २३०९५४१३, मो. ०९२२३४६२८०५, ईमेलः s_sanghvi@hotmail.com; २) श्रीमती बलजीत लाम्बा: फोनः ०९८३३५१८९७९; ३) ३) अलका वेंगुलकरः ०९८२०५८३४४०.

---

**मंगल मृत्यू**

मैस्साचुसेट्स, अमेरिकेच्या कु. लेसली जेनिंग्स वरिष्ठ सहायक आचार्याचे १४ मे,२०१३ ला निधन खूप शांत वातावरणात झाले. त्यांनी धर्माची खूप सेवा केली. त्यांची बहीन आणि काही साधक सोबत साधना करीत होते आणि पूज्य गुरुदेवांच्या वंदनेच्या वेळी शरण-गमण पूर्ण होताच तिने शेवटचा श्वास घेतला. मंगल कामना करतो की सद्धर्माशी तिचा संपर्क कायम राहो.

## निर्माणाधीन विपश्यना केंद्र – धम्म जळगाव

जळगाव - औरंगाबाद रस्त्यावर, १२ किमी. दूर उमला गावात नवीन केंद्राचे निर्माणकार्य आरंभ झाले आहे. ह्या पुण्यकार्यात सहभागी होण्यास इच्छुक साधकांनी संपर्क करावा– **जळगाव विपश्यना संस्था, जळगाव**, स्टेट बैंक ऑफ इंडिया, जिल्हा पेठ शाखा, चालू खाता क्रमांक– 32828343859, IFSC code: SBIN0011515, Email: <hiwarkaranand@gmail.com>

## धम्म मालवा, इंदौरच्या निर्माणकार्याचा विस्तार

विपश्यना केंद्रात दूसऱ्या चरणाचे कार्य आरंभ झाले आहे. ह्यात ३० साधक निवास, रस्ते, भोजन-कक्ष, पाकशाळा इत्यादी आंतरिक कार्यांना पूर्ण करावयाचे आहे. ह्या पुण्यकार्यात भागीदार होण्यास इच्छुक साधक साधिकांनी संपर्क करावा– 53005457719, IFSC code: SBIN0030015. (८०-जी आयकराची सुट आहे.) **संपर्कः** श्री राजू सेठी, Mob. 9826036141.

## निर्माणाधीन विपश्यना केंद्र – धम्म हितकारी

हरियाणाच्या रोहतक शहरापासून १० किमी. च्या अंतरावर लाहली गावात विपश्यना केंद्राचे निर्माणकार्य प्रगतीवर आहे. पूज्य गुरुदेवांनी ह्याला **'धम्म हितकारी'** नाव दिले आहे. विपश्यना ध्यान समिती, द्वारा-जनसेवा संस्थान, भिवानी रोड, रोहतकला ८०-जी आयकरची सुट प्राप्त आहे. साधक ह्या पुण्यकार्यात भागीदार बनून दान-पारमीचा लाभ घेऊ शकतात. खालील बँकात सरळ पैसे जमा केल्यावर कृपया विपश्यना ध्यान समितीच्या व्यवस्थापकाला पावतीसाठी अवश्य सूचित करावे.

**Andhara Bank** A/c 113410011000218 (IFS Code: ANDB0001134) or **Oriental Bank** A/c. 07952191038955 (IFS Code: ORDC0100795) **Email:** vipassanarohtak@gmail.com; 20583440.

———

### धम्मचक्क पवत्तन दिवसाच्या निमित्ताने पूज्य गुरुदेवांच्या सान्निध्यात एक दिवसीय महाशिविर

२१ जुलै, २०१३ रविवार, वेळः सकाळी ११ ते दुपारी ४ पर्यंत 'ग्लोबल विपश्यना पगोडात'. ३ वाजता पूज्य गुरुजीच्या प्रवचनात साधना न केलेले लोकही बसू शकतात. शिबिरासाठी मोठ्या संख्येने धर्मसेवकांचीही आवश्यकता आहे. कृपया खालील फोन नंबर अथवा ईमेलने शीघ्र संपर्ख साधावा. कृपया बुकिंग केल्याविना येऊ नये. बुकिंग संपर्क– **फोन नं.: 022-28451170 / 022-33747501- Extn. 9, 022-33747543 / 33747544, (फोन बुकिंग :** प्रातः **11** ते सायं **5** पर्यंत, प्रतिदिन) **ईमेल Regn: oneday@globalpagoda.org**

**Online Registration: www.oneday.globalpagoda.org**

**अतिरिक्त उत्तरदायित्त्व**

**आचार्य**

१-२. श्री प्रकाश व श्रीमती शुभांगी बोरसे, धुळे, जलगांव व नंदुरबारच्या समन्वयक रूपाने क्षेत्रीय आचार्याची सेवा

**नये उत्तरदायित्त्व**

**वरिष्ठ सहायक आचार्य**

१. श्रीमती प्रेमा सारडा, औरंगाबाद
२. श्री रमेश जैन, औरंगाबाद
३. श्री पुंडलीक अहिरे, कल्याण

**नव नियुक्ती**

**सहायक आचार्य**

१. श्री रामचंद्र सिन्हा, मुजफ्फरपुर
२. श्री अनिरुद्ध कोचे, रायपुर
3. Mr. Anupong Thepwarin, Thailand
4-5. Mr. Chong-Kwang Tay & Mrs. Hoy Yang Pang, Malaysia
6. Mrs. Motoko Sunaga, Japan
7. Mr. Etsuo Takeuchi, Japan
8. Ms. Nin Thong-Innate, Thailand
9. Mrs. Radhi Raja, Singapore

### दोहे धर्माचे

शुद्ध धर्माचा शांतिपथ, पंथापासुन दूर।
शुद्ध धर्माची साधना, मंगलने भरपूर॥

सत्य धर्माला कल्पना, दूषित दे बनवून।
थेंब दही दूधी पडे, मनो जाय फाटून॥

रूप शब्द रस गंध हे, सतत राहती सघन।
विपश्यनेने भंगले, तरची होय विघटन॥

धर्म नद निर्मळ राहो, मळ ना मिश्रित होय।
जन जनचे होवो भले, जन जन मंगलित होय॥

निर्मळ निर्मळ धर्माचे, मंगलच फळ आहे।
बंधन तुटे पापांचे, दुःख मुक्तच राहे॥

### दोहे धर्माचे

सतगुरु संगत मिळाली, मिळे धर्माचा सार।
संप्रदाय ओझ्याचा, उतरे डोयी भार॥

सतगुरुची कृपा होय, लवकर आलो वरी।
दुःख दारिद्र सर्व मिटे, मिळे रत्न ठिगापरी॥

सद्गुरुंनी जर राजपथ, दाखविलाच नसता।
जन्म आंधळ्या बोळीत, फिरत गेला असता॥

तडफडतच तहानेने, गेला असता प्राण।
जर सद्गुरु हे न देते, अमृत द्रव महान॥

अहो भाग्य! गुरुदेवा, प्रज्ञा दे जागवुन।
दर्शन वाद विवादची, बंधने सोडवून॥

धरेवर पुन्हा वाहील, धर्म गंगची धार।
तहान भागे जगाची, करेलच जन उद्धार॥

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरि, इगतपुरी - 422 403
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712, 243238. **फैक्स :** (02553) 244176
**Email:** info@giri.dhamma.org
**Website:** www.vridhamma.org